“सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातील तत्वज्ञानात्मक दृष्टीकोन ; एक चिकीत्स्क अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, मानव्य विद्याशाखांतर्गत तत्वज्ञान विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा पूर्व

संशोधन आराखडा.

संशोधक विद्यार्थिनी

कु. समिक्षा रत्नाकर पाईकराव

ता. पुसद जि. यवतमाळ

ईमेल - paikraosamiksha@gmail.com

Mo. No - 7766861260

मार्गदर्शक

प्रा.डॉ. खलील एन सय्यद

संशोधक मार्गदर्शक व तत्वज्ञान विभाग प्रमुख

पंडित दिनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी, जि. लातूर

पिनकोड - ४१३५१९.

ईमेल - sayyedkhalil42@gmail.com

Mo. No. - 9421369366

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

ऑगस्ट - २०२५

शोधप्रबंधाचा विषय

सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातील तत्वज्ञानात्मक दृष्टीकोन ; एक चिकीत्स्क अभ्यास

1) संशोधनाचा उद्देश

1) देशाच्या प्रगतीमधील स्त्रीयांचे महत्व लक्षात घेणे.
2) स्त्रीयांच्या अनिष्ठ प्रथा, निर्बंधाने विकासातील खीळ
3) प्राचीन, मध्ययुग व आधुनिक काळातील स्त्रीयांची परिस्थितीचा अभ्यास करणे.

2) तथ्य संकलन (Data Collection)

वरील संशोधन करीत असतांना मी प्रथम स्त्रोंतामध्ये मुळ ग्रंथ, सावित्रीबाई यांच्यावर निवडलेले ग्र्‌थ, सावित्रीबाईंची जीवनचरित्र संदर्भग्रंथ तसेच दुय्यम स्त्रोंतामध्ये मी वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट वेगवेगळ्या संकल्पना मार्फत माहीती गोळा करणार आहे.

3) विषयवस्तू - (Objectives)

प्रास्तविक शोध प्रबंध लेखनात मी संशोधनासाठी या विषयाची निवड का केली या संबंधातील अनेक मुद्‌यांचा सविस्तर आढावा घेऊन सावित्रीबाई फुले यांचा तत्वज्ञानात्मक व त्यांचे शैक्षणिक योगदान स्त्रींयासाठी एक मौलिक कार्य आहे. तसेच स्त्री आणि पुरुष यांच्या मध्ये असलेली एक शैक्षणिक दरी कशी दूर करता येईल व त्याच प्रमाणे स्त्रीयांबद्‌दल असलेली पुरुषांची शैक्षणिक बाबतीतत मनस्थिती कशी सुधारता येईल व स्त्रियांना सुध्दा पुरुषा प्रमाणेच जास्तीत जास्त कसे सुशिक्षित करता येईल याचा परामर्श मी

प्रस्तुत शोध प्रंबधात करणार आहे.

4) व्याप्ती- (Scope)

संबंधित संशोधन विषयाचा व्याप्तीचा विचार करतांना माझ्या संशोधनाचा विषय हा तत्वज्ञानातील विश्लेषण पध्दत या विषयांर्गत येत असल्याने तत्वज्ञानाचे सर्वसामान्य स्वरुप व व्याप्ती याचा आढावा घेत स्त्री सुशिक्षित झाली नसती व शैक्षणिक प्रगती केली नसती तर आजच्या काळात त्याचे दुष्परिणाम झाले असते. याचा तत्वज्ञानात्मक दृष्टीकोनातून अभ्यास झाला पाहिजे. याचा तत्वज्ञानात्मक दृष्टीकोनातुन अभ्यास मी या प्रबंधातुन करणार आहे. हे करीत असतांना सावित्रीबाईंचे स्त्रियांबाबतीत शैक्षणिक योगदान किती महत्वाचे आहे याचाही आढावा मी या शोध प्रबंधातुन घेणार आहे.

5) कार्यरेखा- (Research Desigen)

भारतातील स्त्री बद्दल असलेली शैक्षणिक समस्या दूर करुन स्त्रीयांची शैक्षणिक बाबतीत नितीमत्ता उंचावुन स्त्रीला पुरुषा प्रमाणेच उच्च शिक्षित करुन स्त्री पुरुष यांचे शैक्षणिक बाबतीत संख्याबळ हे समान कसे करता येईल याचा विचार मी या प्रबंधानामध्ये करणार आहे. आजही ग्रामीण भागातील स्त्रियांना शिक्षणापासुन वंचित ठेवल्या जाते व त्यांची शैक्षणिक इच्छा असतांना त्यांना हिरावुन घेतल्या जाते त्याचे स्वप्न त्यांना साकार करता येत नाही. या प्रबंधामध्ये मी सावित्रीबाईंचे शैक्षणिक योगदान समोर ठेवून यावर आळा कसा घालता येईल याचाही विचार मी या अनुषंगाने करणार आहे.

6) गृहितके

1) सावित्रीबाई फुले यांचा तत्वज्ञानात्मक दृष्टिकोन अभ्यासणे.
2) सावित्रीबाई फुले यांच्या समाजविषयक चिंतनाचा आणि समस्येचा शोध घेणे.
3) मध्ययुगात स्त्रीयांवर निर्बंध लादले.
4) समाजातील स्त्रीयांना दुय्यम वागणुक मिळु लागल्याने अनेक समाज सुधारकांच्या प्रमाणे सावीत्रीबाई फुले,यांनी महत्वाचे कार्य केले.
5) वर्णव्यवस्थेतुन व जातिव्यवस्थेतून अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या.
6) वैदिक काळातील स्त्रीयांना मान होता.

<u>प्रकरण पहिले</u>

प्रस्तावना -

सावित्रीबाईंचा जन्म नायगाव ता. खंडाळा जि.सातारा येथे 03 जानेवारी 1831 रोजी झाला.वडीलाचे नांव खंडोजी नेवसे पाटील, आईचे नांव लक्ष्मीबाई इ.स. 1840 साली मोठ्या थाटामाटात त्यांचा विवाह संपन्न झाला. त्यावेळी जीतिरावांचे वय हे 13 वर्षाचे तर सावित्रीबाई फुलेचे वय 9 वर्षाचे होते. सासरी येतांना त्याच्याजवळ आई वडीलांच्या आशीर्वादाशिवाय व उपदेशाशिवाय तिला मिळालेले येशु ख्रिस्ताचे पुस्तक होते. आपल्याला या पुस्तकातील फक्त चित्रेच पाहता येतात, काही वाचता येत नाही, याची खंत सावित्रीबाई होती. विवाहानंतर लवकरच सावित्रीबाईं जोतीरावाच्या विचारांशी व कार्याशी समरस झाल्या. जोतीराव हे केवळ प्रेमळ पतीच नाही तर उत्कृष्ठ शिक्षक आहेत याची प्रचीची सावित्रीबाईंना लवकरच येऊ लागली. आधीच शिकण्याची मनस्वी आवड, तशात पतीचा

प्रेमळ सहवास व निसर्गरम्य वातावरण यातुन सावित्रीबाईचे झाडाच्या फांदीच्या काटकीने अ, आ, इ. ई. काढणे सुरु झाले. म. जोतीबा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवले. सावित्रीबाईंची शिकण्याची अशी मनोभुमिका तयार झाल्यामुळे शाळेत जाऊन शिकणे व अध्यापक होण्याकरीता प्रशिक्षण घेणे सावित्रीबाईंना शक्य होऊ लागले. सन 1840 ते 1848 या कालावधीत सावित्रीबाईं बऱ्याच शिकल्या, वाचनामुळे त्यांच्या ठिकाणी बहुश्रुतता आली व त्यामुळे एक खात्रीलायक अध्यापिका सावित्रीबाईंच्या रुपाने जोतीरावांना मिळाल्या, फातिमासारख्या इतर अध्यापिका मिळू लागल्या व स्त्री, अतिशुद्र यांना शिकवण्याचे स्वप्न साकार होऊ लागले.

सावित्रीबाईंनी स्त्रीमुक्ती साठी सुध्दा काम केले. पोट भरण्यासाठी स्त्रियांना लाचारी पत्करावी लागले, गुलामगिरी आणि त्यातुन अत्याचार हे दृष्टचक्र थांबवायचे असेल तर स्त्रिया स्वालंबी झाल्या पाहिजेत त्यासाठी त्यांना काही उद्योग सुरु केले, दीन दलित निराधार स्त्रिया तेथे काम करुन पोटापुरते पैसे कमवत त्यांनी विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी एक सभा स्थापन केली. त्या काळात बालविवाहांचे प्रमाण जास्त होते. स्त्रियांना आसरा देण्यासाठी त्यांना बाल प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. पतीचे निधन झाल्यानंतर स्त्री विद्रुप दिसावी म्हणुन तिचे केशवपन केल्या जात असे. त्यासाठी त्यांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला त्यामुळे या चालीला पायबंद करण्यास थोडी मदत झाली. व अशा प्रकारे त्यांनी स्त्रीमुक्ती चळवळीचे कार्य केले. सावित्रीबाईंनी म.फुले सोबत बालहत्या प्रतिबंधक गृह, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण, केशवपनास बंदी आणि नाभिक बांधवांचा संप तसेच सत्यशोधक समाजातील कार्य हे सर्व काम त्यांनी म. फुले सोबत केले.

1854 मध्ये त्यांनी 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह त्यांनी प्रसिध्द केला व 1973 मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 1982 मध्ये त्यांनी 'बावनकशी' सुबोध रत्नाकर हा दुसरा काव्यसंग्रह अमरावती येथे प्रकाशित केला तसेच 10 मार्च 1897 मध्ये प्लेगग्रस्त व्यक्तीची सेवासुश्रुषा करतांना प्लेगची लागण होऊन त्यांचा मृत्यु झाला.

प्रकरण दुसरे

सावित्रीबाई यांचे आत्मनिर्भरतेचे कार्य -

सावित्रीबाईं फुले यांनी स्त्रियांना स्वत:चा उद्धार स्वत: करता यावा व स्वत:च्या कष्टातुन छोट्या मोठ्या उद्योगातुन स्वत:चे पोट भरता यावे. यासाठी त्यांनी स्त्रियांना आत्मनिर्भयतेचे धडे दिले. महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती आंदोलनाची पहिली अग्रणी म्हणुन

सावित्रीबाई फुले यांना ओळखले जाते. सावित्रीबाईं यांना हळदी कुंकु च्या माध्यामातुन स्त्रियांना एकत्रित केले व कोणत्याही स्त्रीला भेदभाव न करता सर्व स्त्रियांना समान व समतेने वागविले. हळदी कुंकु हा कार्यक्रम फक्त त्यांमच्यासाठी स्त्रियांना एकत्रित करण्याचा कार्यक्रम होता व सर्व स्त्रियांना समान मानुन त्यांनी समाजातील लोकांना समतेचा संदेश दिला व या माध्यमातुन स्त्रियांना आत्मनिर्भर कसे होता होईल याचे धडे दिले.

प्रकरण तिसरे

समकालीन स्त्री आणि सावित्रीबाई फुले -

या प्रकरणामध्ये मी विविध समाजसुधारकांचा प्रभाव जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयां बद्दलचे विचार त्यात त्यांचे मनुस्मृती दहन, ताराबाई शिंदे यांचा स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ, डॉ. आनंदीबाई जोशी यांचा डॉक्टर होण्यापर्यंतचा प्रवास, फातिमा शेख ह्या पहिल्या मुस्लीम शिक्षिका, पंडीता रमाबाई, महात्मा फुले व अन्य समाज सुधारकांचा आढावा घेणार आहे. त्याच प्रमाणे महिला सक्षमीकरण व सावित्रीबाईनी जाती व्यवस्थेचा लढा कशा पध्दतीने केला व अनेक स्त्रीमुक्ती चळवळ करुन महिलेला न्याय कसा मिळवुन दिला व आजची स्त्री उच्च पदावर कशाप्रकारे गेली याचा आढावा मी या प्रकरणामध्ये घेणार आहे.

प्रकरणे चौथे

सावित्रीबाई फुले यांचे तात्वीक विचार

शैक्षणिक कार्य

सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणावर भर देऊन अस्पृश्य वर्गातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय केली. फातिमा शेख या मुस्लीम समाजातील प्रशिक्षित अध्यापिकेची अध्यापन कार्यात मदत मिळाल्यामुळे मुस्लीम बांधवांचेही सहकार्य मिळाले. सन 1948 हे वर्षे भारताच्या दृष्टीने एक क्रांतीकारी वर्षे म्हणावे लागेल. 01 जानेवारी 1848 या दिवशी पूण्याच्या बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरु केली. केली. सावित्रीबाईनी घरोघरी जाऊन व मुलींच्या पालकांची समजुत काढत 6 वर्षाच्या आतील 6 मुली शाळेत दाखल करुन घेतल्या दलितांच्या मुलामुलींना एकत्र शिक्षण देणारी एक स्वकीय शाळा त्यांनी स्थापन केली व अशा प्रकारे शैक्षणिक कार्य त्यांनी केले.

सामाजिक कार्य

बालहत्या प्रतिबंधक गृह -

जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले या दाम्प्त्याने 28 जानेवारी 1853 ला स्वत:च्या घराशेजारी उस्मान शेख यांच्या जागेत बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. सावित्रीबाईच्या सक्रीय सहभागशिवाय हे बालहत्या प्रतिबंधक गृह जोतीरावांना चालवता आले नसते. सामाजिक सुधारणेच्या अनेक कल्पना जोतीराव फुले यांच्या डोळ्यात येत व त्यांची समर्थपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सावित्रीबाई मोठ्या आनंदाने व कार्यक्षमतेने पार पाडत. महाराष्ट्रातील पहिले बालप्रतिबंधक गृह असावे.

अनाथ बालिकाश्रम -

01 जानेवारी 1857 पासुन हे बालिकाश्रम सुरु होते. सन 1983 साली स्वत:च्या वाड्यात स्वतंत्र जागा बांधुन विधवांच्या गुप्त बाळतपणाचीही सोय करण्यात आली. या अनाथ बालिकाश्रमाकडे जोतीरावाप्रमाणे सावित्रीबाई जातीने लक्ष पुरवित असे.

स्त्री संघटन कार्याची स्थापना -

सन 1860 सालापासुन जोतीराव फुले यांचे विधवा पुनर्विवाहा बाबत सक्रिय कार्य सुरु होते. त्याला सावित्रीबाईनी स्त्री संघटनेची या दरम्यान स्थापन करुन भरघोस सहकार्य केले. फुले वाड्यात या संघटनेच्या बैठका होत असे. यामध्ये स्त्री जीवनाच्या समस्यावर विचारविनिमय होत असे. सावित्रीबाईला शुद्र, अतिशुद्र भगिनींची साथ मिळाली व त्यांनी सामुहिक हळदीकुंकवाचे आयोजन केले व सर्व जातीतील स्त्रियांना समाज स्थान दिले. स्त्रियांना आपल्या समस्या मांडण्यात व त्यांना बोलके करण्यास सावित्रीबाईचा पुढाकार कारणीभुत होता. त्यामुळे त्यांना स्त्री मुक्ती आंदोलनाची गंगोत्री असे संबोधणे ईष्ट होईल.

विधवा विवाह व न्हाव्यांचा संप या करीता हृदय परिवर्तनाचा प्रयत्न

सावित्रीबाई फुले यांच्या काळात मुलींचा लहान वयात विवाह होणे ही रुढी प्रचलित होती. अल्पवयातच पतीचा मृत्यु झाल्यास बालविधवेचे समाजात फार हाल होत असत. विधवांना सती जाणे किंवा समाजमान्य हाल अपेष्ठा सहन करणे, यांच्या शिवाय पर्याय नसे. सावित्रीबाईना बालविधवेचे दुख पाहवले नाही. म्हणुन त्यांनी स्त्रियांना संघटीत करुन त्यांचा दुखाला वाचा फोडली पती निधनानंतर पत्नीचे केशवपन करण्यात येत असे या प्रथेला विरोध म्हणुन त्यांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला.

सत्यशोधक समाज कार्य -

धर्म आणि जातीचे थोतांड कर्मकांडे हाणुन सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक धर्माचा पुरस्कार केला. सत्यशोधक चळवळीच्या सावित्रीबाई खऱ्या प्रणेता होत्या. अन्याय, अत्याचार, गुलामगिरीतुन शुद्रा, अतिशुद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 24 सप्टेंबर 1873 रोजी महात्मा

फुले व सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. मानवाच्या अंगी असलेल्या सदगुणांची जोपासना व्हावी ही विचार दृढ करणाचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला. सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा ग्रंथ मानला जातो. तसेच दिनबंधू नावाचे साप्ताहिक त्यांनी सत्यशोधकसमाजा तर्फे चालवले. समाजातील विषमता नष्ट करुन तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

स्त्री मुक्ती चळवळ

सावित्रीबाईनी स्त्रीमुक्ती चळवळ उभी केली. पोट भरण्यासाठी स्त्रीयांना लाचारी पत्करावी लागत होती. त्यातुन गुलामगिरी आणि त्यातुन अत्याचार हे दृष्ट चक्र थांबवायचे असेल तर स्त्रिया स्वावलंबी झाल्या पाहिजेत त्यासाठी त्यांनी काही घरगुती उद्योग सुरु केले. दिन दलित निराधार स्त्रिया तेथे काम करुन पैसे कमवत अशा प्रकारे त्यांनी स्त्रीमुक्ती चळवळ तयार करुन स्त्रीयांना सर्व गुलामगिरीतुन मुक्त केले

प्रकरण पाचवे

सावित्रीबाई फुले आणि आधुनिक दृष्टीकोन

सावित्रीबाईनी ज्योतिबा फुले प्रमाणे शिक्षणाविषयक चिंतन व मनन होत असले पाहिजे काही शंका व अडचणी त्यांच्याही मनात उदभवत असल्या पाहिजेत सावित्रीबाईनी शिक्षणा विषयक प्रेरणा ही बेगडी नव्हती. त्यांनी जाणुन बुजुन शिक्षणाचे व्रत घेतले होते. तसे नसते तर त्या क्षणी त्यांच्यावर शेणा गोळयांचा वर्षाव झाला, त्याच्या दुसऱ्या दिवशी त्या शाळेत गेल्या नसत्या. त्यांनी हे जरी सर्व सहन केले ते कळत स्त्रियांचा उद्धार स्त्रियांनीच स्वत: केला पाहिजे. हा त्यांचा एक आधुनिक दृष्टीकोन होता व सावित्रीबाईनी स्त्री विषयक ज्या चळवळी केल्या त्या सर्व चळवळीचा पुढील अभ्यास करतांना मला उपयोग होणार आहे. मनुष्याचा खरा दागिना शिक्षण होय, कारण त्यामुळे अभिमानाने जगण्याची संधी उपलब्ध होते व युगांयुगांची गुलामगिरी तोडून मुलींनी शिक्षण घ्यावे हा या मागचा दृष्टीकोन आहे.

निष्कर्ष

प्रस्तुर प्रकरणात संपुर्ण अभ्यासअंती सावित्रीबाई फुले यांच्या तत्वज्ञानात्मक चिंतनाचा व आजच्या स्त्री वर्गाला आवश्यक असणारे आधुनिक काही निष्कर्ष मांडले जाणार आहेत तसेच सावित्रीबाई फुले यांच्या तत्वचिंतनाचा आणि तत्वज्ञानाविषयक दृष्टिकोनाचा शोध घेणे.

संदर्भग्रंथ,

1) प्रा. ना.ग.पवार (2014), सावित्रीबाई फुले अष्टपैलु व्यक्तिमत्व - पधगंधा प्रकाशन, पूणे

2) कृ. प. देशपांडे, सौ. शुभदा देशपांडे खंड -4, भारतीय मातृकथा, गंधर्व वैद प्रकाशन, पूणे

3) डॉ. एस.एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा ईतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

4) डॉ.मा.गो.माळी,मुंबई, सावित्रीबाई फुले समग्र वाडमय

5) प्रा. डॉ. महाजन, मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन, व्यस्थापन ग्रंथ, निर्मिती केंद्र य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

6) डॉ, लिला पाटील, भारतीय स्त्री जीवन -मेहता पब्लिकेशन, पूणे

7) शिवराज गौर्ले, स्त्री विरुध्द पुरुष -राजहंस प्रकाशन, पूणे

8) सामंत मंगला, स्त्री पुर्व -सुगावा प्रकाशन, पूणे

9) प्रा.गोटे शुभांगी महिला सबलीकरण स्वरुप समस्या,वरद पब्लिकेशन, औरंगाबाद

10) प्रा. मोरे दिनेश, शिवरायांचा स्त्री विषयक दृष्टिकोन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

11) अभय देशपांडे, स्त्री स्वतंत्र्याची दुसरी बाजु,

12) डॉ. लिला पाटील, शिवरायाच्या आईसाहेब, विवेक पब्लिकेशन

13) शांता रानडे, सावित्रीबाई जोतीबा फुले जीवनकार्य-

14) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले (विद्याविकास)

15) सविता कुलकर्णी, साहवी सावित्राबाई फूले, भारतीय विचार साधना प्रकाशन

16) अ.ना.देशपांडे, आधुनिक मराठी वाडमयाचा ईतिहास- भाग पहिला व्हीनस प्रकाशन,पूणे

17) चंद नानक (2015), डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी,औरंगाबाद साकेत प्रकाशन

18) निकम गौतम (2 019) प्राचीन काळातील स्त्रीयांचा दर्जा, चाळीसगाव, विमलकिर्ती प्रकाशन

19) सबाने अरुणा (2007), डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री, नागपूर आकांक्षा प्रकाशन

20) BHARDWAJ, PAWAN (1974), The Legend of Jyotibha Phule, Delhi, Punit Publication,

21) कांबळे, झुंबरलाल व बिवलकर, राम (2006) महाडच्या मुक्तीसंग्राम, पूणे बार्टी